ॐ

Om

# ||श्री लक्ष्मी सूक्त||

||Shree Lakshmi Suktam||

पद्मानने पद्मऊरु पद्माक्षी पद्मसम्भवे।

त्वं मां भजस्व पद्माक्षी येन सौख्यं लभाम्यहम्।।

जिचा चेहरा कमलाप्रमाणे प्रफुल्लित आहे, जिचे अंगांग कमलाप्रमाणे कोमल आहे, जिचे नेत्र कमलाच्या पाकळ्यांसारखे (कमलनयना) आहेत व जी कमळात स्थित आहे, तिला (लक्ष्मी देवतेला) मी शरण आलो आहे. तिच्या कृपेने मला सौख्य प्राप्ती होवो.

Oh Mother Lakshmi, whose face is bloomed like lotus, whose limbs are soft as lotus, who resides atop lotus (kundalini) and has eyes in shape of lotus petals, I bow before you and your blessings may bring happiness in my life.

अश्वदायि गोदामि धनदायि महाधने।

धनं मे जूषताम् देवी सर्व कामांश्च देहि मे।।

हे देवी, तुझ्या कृपेने भक्तांना अश्व, गोधन संपत्ती प्राप्त होवो. तू आम्हांला वैभव प्रदान करुन आमच्या सर्व कामना पूर्ण कर.

Oh Goddess, you bestow upon your devotee horses, cows and wealth. Please bless me with riches and fulfill all my desires.

पुत्र पौत्र धनं धान्यं हस्त्यश्वादिगवे रथम्।

प्रजानां भवसि माता आयुष्मन्तं करोतु माम्।।

हे माते, आम्हांला पुत्र, पौत्र (नातवंडे), धनसंपत्ति, धान्य, हत्ती, घोडे, पशुधन व रथ प्राप्त होवोत. तू सर्वांची माता आहेत. आम्हाला व आम्ही प्रजनन केलेल्या (वंशजाना) दीर्घ व उत्तम आयुष्य प्रदान कर.

Oh Mother, let your blessings make us begot children and grandchildren, may our family be enriched with grains, food, possession of elephants, horses, cattle and carriages. Bless us and our progeny with long vigorous life.

धनमग्निर्धनं वायुर्धनं सूर्यो धनं वसुः।

धनमिन्द्रो बृहस्पतिर्वरुणं धनमश्नुते।।

हे धनस्वरुपे, तुझी कृपा अग्निदेवता (अग्नि), वायुदेवता (वायू), सूर्यदेवता (प्रकाश), वसु (आकाशवासी देवता) यांना सामर्थ्य देते. इंद्रदेवता (देवांचा अधिपती), बृहस्पति (देवगुरु) तसेच वरुण (जलदेवता) हे तुझ्या आश्रयाने रहातात.

Oh Mother (Dhanada i.e. one which gives inner and outer wealth) you are the shakti (power) of Agnidevata (Element of Fire), Vayudevata

(Element of wind energy) Suryadevata (Element of light i.e. Sun) and Vasu (celestial beings). You give power to Indra (King of Gods) and Brihaspati (Guru) and also to Varundevata (Element of water). You as a supreme ruler is all encompassing essence behind everything in world.

वैनतेयं सोमं पिब सोमं पिबतु वृत्रहा।

सोमं धनस्य सोमिनो मह्यं ददातु सोमिनः।।

तू दिलेल्या अमृताने (वृत्रासुराचा वध करणारा) इंद्र व विनतेचा पुत्र गरुड (वैनतेय) अमरत्वाला पावले. तुझ्या कृपेने मला अमृतत्त्व प्राप्त होवो.

Oh Mother, you gave divine elixir (Amrut) to Vainateya (Garuda, the son of Vinata and vehicle of Vishnu) and Indra (who killed Vritrasura by weapon created from bones of Dadhichi), we may be blessed with your divine grace and receive elixir of life.

न क्रोधो न च मात्सर्यं न लोभो नाशुभः मतिः।

भवन्ति कृतपुण्यानां भक्तानां श्रीसूक्तं जपेत्।।

जे या श्री सूक्ताचा पाठ करतात ते पुण्यप्राप्ती होऊन सन्मार्गावर प्रगति करतात. देवी भक्तांना क्रोध, मत्सर, लोभ व अशुभ विचारांपासून त्रास होत नाही.

Oh Mother, those who recite your prayers walk the path of righteousness and undertake good deeds. They do not suffer from

mortal desires like greed, jealousy, anger nor their intellect is corrupted with unholy intentions.

वर्षन्तु ते विभावरि दिवो अभ्रस्य विद्युतः।
रोहन्तु सर्वबीजान्यव ब्रह्म द्विषो जहि।।

हे माते, माझ्यातील द्वेष भाव नष्ट कर. मायेच्या अंधकारात तू विद्युल्लते प्रमाणे ज्ञान प्रकाश देतेस व मेघांप्रमाणे कृपावर्षाव करतेस. माझ्यातील दोषांची बीजे नष्ट करुन मला ब्रह्म प्राप्तीच्या मार्गावर उन्नति दे.

Oh Mother Goddess, remove hatred from my mind. In darkness of illusion, you provide spiritual vision like lightening and shower your blessings like raining clouds. Please remove the seeds of ignorance and vices from me and take me on path to salvation.

पद्मप्रिये पद्महस्ते पद्मालये पद्मदलायताक्षि।
विश्वप्रिये विष्णुमनो ऽ नुकूले त्वपादपद्मं मयि सन्निधत्स्व।।

हे देवी, तू कमल प्रिय असणारी, कमल हातात धारण करणारी, कमलामधे निवास करणारी व कमलाच्या पाकळ्यांप्रमाणे नेत्र असलेली आहेस. तू विश्वाला प्रिय व श्री विष्णूना अनुकूल (प्रिय) असणारी आहेस. तुझ्या कृपेने मला तुझ्या कमलचरणांशी स्थान प्राप्त होवो.

Oh mother, Lotus is dear to your heart, you are holding lotus in your hand and residing in abode of lotus(kundalini) and your eyes are

shaped like petals of lotus, and you are loved by universe and dearest to Lord Vishnu, I seek a place near your lotus feet.

या सां पद्मासनस्था विपुलकटितटी पद्मपत्रायताक्षी ।

गम्भीरा वर्तनाभिः स्तनभर नमिता शुभ्र वस्त्रोत्तरीया ।।

हे माते, तू शुभ्र वस्त्र परिधान करुन कमलासनामधे स्थित आहेस. विस्तृत कटिप्रदेश व (दैवी संपत्ति व भक्तांविषयी प्रेमभाव दर्शवणाऱ्या) विशाल वक्ष:स्थळानी व (ज्ञानसागराचे द्योतक असलेल्या) सखोल नाभीने युक्त अशी तू पुढे झुकून भक्तांकडे कृपादृष्टीने पहात आहेस.

Oh mother, you are draped in a milky white garment seating atop lotus (kundalini) bestowed with wide waistline, eyes like lotus petals, a deep navel (sea of knowledge) and full bosom (indicating abundance and compassion to her spiritual devotees) and have bent forward to bless devotees.

लक्ष्मी र्दिव्यैर्गजेन्द्रैर्मणिगणखचितैस्स्नापिता हेमकुम्भैः ।

नित्यं सा पद्महस्ता मम वसतु गृहे सर्वमाङ्गल्ययुक्ता ।।

हे सर्वांचे कल्याण करणाऱ्या देवते (जी मांगल्य व पवित्रतेचे प्रतीक आहे), रत्नजडित ऐरावत क्षीरसागरामधे सुवर्णकुंभातून पवित्र जलाचा तुझ्यावर अभिषेक करत आहेत. तू नित्य हातात कमल धारण करतेस. माझ्या निवासस्थानी वास करुन माझे मंगल कर.

Oh Devi Sarvamangala (who has all auspicious attributes and brings good things), you are bathed in holy water from golden pot held by celestial elephants studded with gems, you are holding lotus in your hand, bless me by residing in my house and make it auspicious by your presence.

लक्ष्मीं क्षीरसमुद्र राजतनयां श्रीरङ्गधामेश्वरीम्।
दासीभूत समस्त देव वनिता लोकैक दिपांकुराम्।।

तू क्षीरसागर कन्या आहेस व वैकुंठामधे वास करतेस. सर्व देवगण व दिव्य दासी तुझी सेवा करतात. सर्व लोक (जगत) तुझ्या दिव्य तेजातून निर्माण झाले आहे.

Oh Mother, you are daughter of ocean, residing in sea of milk in abode of Lord Vishnu, all gods and graceful celestial damsels serve you like your servants and everything in each level of cosmos (level of existence) generates and manifest from your light.

श्री मन्मन्द कटाक्षलब्ध विभव ब्रह्मेन्द्रगङ्गाधराम्।
त्वां त्रैलोक्य कुटुंबिनीं सरसिजां वन्दे मुकुन्दप्रियाम्।।

हे देवी तुझ्या सौम्य कृपाकटाक्षाने ब्रह्मा, इंद्र व शंकराना अनुग्रह प्राप्त झाला. तू त्रैलोक्याची माता असून श्री विष्णूंना प्रिय आहेस. सदैव कमल धारण करणाऱ्या तुला मी वंदन करतो.

Oh Mother, with your graceful soft glance, you bestowed power to Brahma, Indra (king of God) and Gangadhar (Shiva), you are the supreme mother of three worlds, I pray thee who is dear to Mukund (Vishnu) and always hold lotus.

सिध्दलक्ष्मी मोंक्षलक्ष्मीर्जयलक्ष्मी स्सरस्वती।
श्री लक्ष्मीर्वरलक्ष्मीश्च प्रसन्ना मम सर्वदा।।

तू सिध्दलक्ष्मी, मोक्षलक्ष्मी, जयलक्ष्मी, देवी सरस्वती, श्री लक्ष्मी, वरलक्ष्मी इत्यादि अनंत रुपाने प्रकट झाली आहेस. माझ्यावर निरंतर तुझी कृपा दृष्टी राहू दे।।

Oh Mother, you have manifested yourself in many forms to bless your devotees, like Siddha Lakshmi (bestows enlightenment), Moksha Lakshmi (bestows salvation), Jay Lakshmi (bestows victory), Devi Saraswati(Goddess of wisdom and knowledge), Shri Lakshmi (bestows wealth) and Vara Lakshmi (bestows boon). I pray thee to always shower your grace upon me.

वरांकुशौ पाशमभीतिमुद्रां, करैर्वहन्तीं कमलासनस्थाम।
बालार्क कोटि प्रतिभां त्रिनेत्रां भजेहमाद्यां जगदीस्वरींत्वाम्।।

हे जगदीश्वरी, तू एका हाताने भक्तांना वरप्रदान करत आहेस. दुसऱ्या हातात अंकुश धारण केलेला आहेस, तिसऱ्या हातात पाश धारण केलेला आहे व अभयमुद्रा धारण

करुन कमलासनामधे स्थित आहेस. तीन नेत्र असलेल्या व कोटि बालसूर्यांप्रमाणे तेजस्वी असलेल्या हे विश्वजननी (आद्या), मी तुला भजतो.

Oh Mother, with one hand giving boon (vara) to devotees, hook (ankush) in other hand, noose (pasha) in another hand and fearlessness on your face, you are abided on lotus emanating radiance like crores of rising suns, glancing mercifully through three divine eyes, I submit myself before you oh Goddess of the world. You are primordial source of Universe (Aadhya).

सर्वमंगल मांगल्ये, शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते।।

हे देवी, तू सर्व प्राणिमात्रांचे मंगल (कल्याण) करणारी मांगल्या आहेस. तू पवित्र असून सर्वांची कार्ये सिध्द करतेस. हे गौरी (पार्वती), तुला शरण आलेल्यांवर तू कृपा करतेस. हे नारायणी, मी तुला नमस्कार करतो.

You are holy and brings auspiciousness and completeness to everything graced by you, oh Devi Parvati, you give refuge to those who surrender before you, Oh Narayani, I bow before you.

सरसिजनिलये सरोजहस्ते धवलतरांशुक गंधमाल्यशोभे।
भगवती हरिवल्लभे मनोज्ञे, त्रिभुवनभूतिकरी प्रसीद मह्यम्।।

हे माते, तू कमलासनावर स्थिर आहेस, व हाती कमल धारण करुन शुभ्र वस्त्र परिधान केले आहेस. तुझ्या गळ्यात सुगंधी पुष्पमाला शोभून दिसत आहेत. हे विष्णुप्रिये, तू भक्तांच्या मनावर राज्य करतेस, व तीनही भुवनातील सर्व भूतमात्रांचे कल्याण करतेस. मला तुझा कृपाप्रसाद प्राप्त होवो.

Oh Mother, who resides in Lotus, holding a lotus in her hand, draped in milky white cloth, decorated with fragrant garlands with glowing aura around her, you are dear to Hari (Vishnu) and captivate minds of devotees, you are reason of wellbeing in all three worlds, favor me with your sacrament.

विष्णुपत्नीं क्षमांदेवी माधवी माधव प्रियाम्।
विष्णोः प्रियसखीं देवीं नमाम्यच्युतवल्लभाम्।।

हे माते, तू भगवान विष्णूंना प्रिय असलेली व त्यांच्या माधव व अच्युत या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रुपात माधवी व वल्लभ या नावाने जाणली जाणारी प्रियसखी आहेस. आम्हांवर तुझी क्षमा दृष्टी असू दे।

Oh Mother, you are dear to Vishnu as consort, are called Madhavi as dear to Madhava (Vishnu), companion to Vishnu and beloved by Vishnu as Achyuta, I pray you with request to forbear (my sins).

महालक्ष्मीं च विद्महे विष्णूपत्नींच धीमहि।
तन्नो लक्ष्मी प्रचोदयात्।।

आम्ही विष्णूपत्नी महालक्ष्मी चे ध्यान करतो व तिची प्रार्थना करतो. आम्हांला लक्ष्मी प्रसन्न होवो, व आमच्यावर तिची कृपा दृष्टी राहो.

We meditate in the bhakti of Mahalaxmi, who is consort of Vishnu, to seek her divine essence (Sayujyata) for salvation. May her blessings awaken spiritual consciousness in us.

श्री वर्चस्यमायुष्यमारोग्यमाविधात् पवमानं महियते।

धनं धान्यं पशुं बहुपुत्रलाभं शतसंवत्सरं दीर्घमायुः।।

तुझी कृपा भक्तांना आयुष्य, आरोग्य व कीर्ती प्रदान करते. तुझ्या आशिर्वादाने आम्हांला धन, धान्य, पशुधन, अनेक पुत्र व आरोग्यमयी शतायुष्य प्राप्त होवो.

Oh Mother, Your absolute power showers devotees with long life, health and fame. Let your blessings give us wealth, grains, many offspring, a vital life for more than hundred years.

ऋणरोगादिदारिद्र्यपापक्षुदपमृत्यवः।

भयशोकमनस्तापा नश्यन्तु मम सर्वदा।

हे देवी, तुझ्या कृपेने माझे कर्ज, रोग, दरिद्रता, पाप, अपमृत्यूचे संकट, भय, शोक व मानसिक ताप कायमस्वरुपी नष्ट होवोत.

Oh Mother, let your worship remove for all time to come, challenges like indebtedness, illness, poverty, sins, untimely death, fear, sorrow and mental anguish from my life.

य एवं वेद।। ॐ महादेव्यै च विद्महे विष्णुपत्नींच धीमहि।

तन्नो लक्ष्मी प्रचोदयात।।

हे सत्य आहे. आम्ही महादेवीचे ध्यान करतो, व तिची विष्णुपत्नी (रुपात) प्रार्थना करतो. देवी लक्ष्मी आमच्यावर प्रसन्न होवो व आम्हाला दैवी उन्नतीच्या मार्गावर नेवो.

This indeed is an ultimate truth from scriptures. When one submits to Mahadevi (Great goddess) who is consort of Vishnu, and meditate on her, Mahalakshmi inspires devotee in to spiritual consciousness.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

Om Shanti, Shanti, Shanti.


संदर्भसूची: www.marathi.shrusti.com

www.drikpanchay.com

www.greenmessage.com